# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
### वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 30.08.2025** **वार- शनिवार**

---

**गैरफायदा**

मुख्यमंत्री 'माझी लाडकी बहीण' योजनेचा पुणे जिल्हा परिषदेतील 54 महिला कर्मचाऱ्यांनी लाभ घेतल्याचं उघड झालं आहे. या प्रकरणी महिला आणि बालकल्याण विभागानं सादर केलेल्या अहवालानंतर दोषींवर लवकरच कारवाई केली जाईल, अशी माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी दिली. राज्य सरकारच्या या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत आतापर्यंत 2 कोटी 63 लाख महिलांनी नोंदणी केली होती. त्यापैकी 2 कोटी 41 लाख महिला पात्र ठरल्या. विधानसभा निवडणुकांनंतर उर्वरित अर्जांची छाननी केली असता, त्यात लाखो अर्ज अपात्र ठरवण्यात आले. जून महिन्यात योजनेच्या घेतलेल्या आढाव्यात मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार उघडकीस आले.

**अन्न**

गणेशोत्सवात नागरिकांना स्वच्छ आणि गुणवत्तापूर्ण अन्न मिळावं यासाठी अन्न आणि औषध प्रशासनाच्या पुणे विभागानं विशेष तपासणी मोहिम हाती घेतली आहे. सणासुदीच्या काळात विक्रीस येणाऱ्या अन्नपदार्थांमध्ये भेसळीबाबत काही संशय आढळल्यास नागरिकांनी तत्काळ 18 00 222 365 या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असं आवाहन प्रशासनाकडून करण्यात आलं आहे. पुणे जिल्ह्यात सुरू झालेल्या तपासणी मोहिमेत आतापर्यंत 35 अन्न आस्थापनांची तपासणी करण्यात आली असून 62 अन्न नमुने विश्लेषणासाठी

घेण्यात आले आहेत. यात प्रसादासाठी लागणारे कच्चे अन्नपदार्थ, मिठाई आदींचा समावेश आहे. विश्लेषण अहवाल प्राप्त होताच दोषी आस्थापनांवर कायद्याप्रमाणे कठोर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती अन्न आणि औषध प्रशासनाचे पुणे विभागाचे सह-आयुक्त सुरेश अन्नापुरे यांनी दिली.

**मूर्ती**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागामार्फत सुरू असलेल्या गणेशोत्सव मूर्ती संकलन उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या उपक्रमांतर्गत आज दुपारी बारा वाजेपर्यंत शहरातील 8 प्रभागांतून 4 हजार 532 मूर्तींचं संकलन करण्यात आलं. यामध्ये पर्यावरण पूरक मूर्ती 822 तर पीओपीच्या 3 हजार 210 मूर्तींचा समावेश आहे.

**वॉक**

पुणे पुस्तक महोत्सवाद्वारे गणेशोत्सवानिमित्त पहिल्या 'हेरिटेज वॉक'चं आज आयोजन केलं होतं. सोमवार पेठेतील ऐतिहासिक त्रिशुंड गणपती मंदिराच्या परिसरात आयोजित या उपक्रमात 100 हून अधिक नागरिक उत्साहानं सहभागी झाले. इतिहास अभ्यासक अमोघ वैद्य यांनी उपस्थितांना या मंदिराच्या समृद्ध इतिहासाची माहिती दिली.

**परदेशी**

राष्ट्रप्रथम ट्रस्ट, सदैव फाउंडेशन आणि अमित फाटक फाउंडेशन यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या गणेश उत्सवाच्या अंतर्गत सावित्रीबाई फुले विद्यापीठाखालील विविध महाविद्यालयांत शिकणाऱ्या सुमारे 400 परदेशी

विद्यार्थ्यांसाठी आज हेरिटेज वॉक घेण्यात आला. पुण्याचा ऐतिहासिक वारसा सांगणारं पेशवेकालीन त्रिशुंड गणपती मंदिर, ग्रामदैवत कसबा गणपतीचं दर्शन, श्रीमंत भाऊ रंगारी भवनातील स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, दगडूशेठ गणपतीचं दर्शन आणि पुण्याच्या गणेशोत्सवाची भव्यता, ऐतिहासिक ठेवा पाहून हे परदेशी विद्यार्थी हरखून गेले. उच्च आणि तंत्रशिक्षण, पर्यटन आणि सांस्कृतिक विभागाचं या महोत्सवाला विशेष सहकार्य लाभलं आहे.

**<u>नड्‌डा</u>**

केंद्रीय आरोग्य मंत्री आणि भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्‌डा यांनी आज पुण्यातील कोथरूड इथल्या श्री साई मित्र मंडळाच्या गणरायाचं दर्शन घेऊन पूजा केली आणि आशीर्वाद घेतले. या मंडळाचा संपूर्ण कारभार महिला कार्यकर्त्यांच्या हाती सोपविण्यात आला आहे याबद्दल नड्‌डा यांनी विशेष कौतुक केलं.

**<u>मंजुरी</u>**

राष्ट्रीय वैद्यकीय विज्ञान परीक्षा मंडळानं पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नवीन थेरगाव रुग्णालयाला जनरल मेडिसीन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी 2025 प्रवेश सत्राकरिता चार जागा मंजूर केल्या आहेत, अशी माहिती महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी आज दिली.

**<u>उत्सव</u>**

विविध संस्थांच्या सहयोगानं आयोजित -उत्सव हेरिटेज सिटीज सिरीज, पुणे एडिशन- या कार्यक्रमाचं आज नगर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या

हस्ते उद्घाटन करण्यात आलं. पुणे शहरातील ऐतिहासिक वारसा जपणाऱ्या वास्तु आणि उत्सव या दोन्हीचा सुंदर मिलाफ देशभर पोहोचवण्याचा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. या कार्यक्रमांतर्गत हेरिटेज वॉक, स्केचिंग, राष्ट्रीय परिषद, किर्तन असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

**मेश्राम**

पुणे जिल्ह्यात ग्रामपंचायतीचं नगर परिषदेमध्ये परिवर्तन होत असतांना स्वच्छता कर्मचारी या पदाचा आकृतीबंधात समावेश केलेला नाही याची गंभीर दखल घेतली असल्याचं महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती आयोगाचे उपाध्यक्ष ॲडव्होकेट धर्मपाल मेश्राम यांनी पुण्यात पत्रकार परिषदेत सांगितलं. याबाबत नगर विकास प्रशासनाला कारणं दाखवा नोटीस बजावली असून या पदाला आकृतीबंधात समावेश करण्याची शिफारस करण्यात आली आहे, असंही मेश्राम म्हणाले.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**